**Lokmat, Thursday 25 July 2019**

लोकमत

# डॉन बॉस्कोच्या विद्यार्थ्यांची 'तळावलीकर'मध्ये प्रात्यक्षिके

लोकमत न्यूज नेटवर्क

**मडगाव :** साकोर्डे येथील डॉन बॉस्को कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सुळकर्णे येथील श्रीमती हिराबाई तळावलीकर हायस्कूलमध्ये कृषीसंबंधी अनेक प्रात्यक्षिके सादर केली. अंशुल लांजेकरने पॉवरपॉइंट सादरीकरण दिले. वंदित नाईकने रोज बडिंग, सॉफ्टवुड ग्राफ्टिंग आणि स्टोन ग्राफ्टिंगच्या पद्धती समजावून सांगितल्या. यासाठी रुणाल कोमरपंत, स्वप्नील गावकर आणि प्रेमकिशन गावकर यांनी सहकार्य केले.

मुलांनी स्वत:ही काही प्रयोग करून या उपक्रमाचा आनंद घेतला. याच कार्यक्रमाचे निमित्त साधून शाळेत सायन्स क्लबचे उद्घाटन प्रमुख पाहुणे दीपक देसाई यांच्या हस्ते झाले. या वेळी राजाराम जोग, भावे उपस्थित होते.



कृषीसंबंधी प्रात्यक्षिके सादर करताना विद्यार्थी.

कुशाल नाईक आणि हृषीकेश पार्सेकर यांनी सीड बॉम्बसंबंधी प्रात्यक्षिक दाखवले.

Goa Main
Page No. 6 Jul 25, 2019
Powered by: erelego.com